विशेष



ेस- उपचारांपूर्वी



चेहऱ्यावरील केस- उपचारांनंतर



पूर्वी



तर

# सौंदर्यवर्धनासाठी लेझर

**लेझर किरणांच्या साह्याने सौंदर्य खुलविणे आता अधिक सोपे बनले आहे. शरीरावरचे अनावश्यक केस काढून टाकण्यापासून मुरुमे नाहीशी करण्यापर्यंत याचे अनेक उपयोग करता येतात.**

**डॉ. पराग सहस्त्रबुद्धे**
सुघटनशल्यविशारद, पुणे.

लेझर सौंदर्यवर्धक ट्रीटमेंट - रिव्हाइव लेझर व कॉस्मेटिक सेंटर (लेझर हेअर रिमुव्हल)

कॉस्मेटिक सर्जरीमध्ये लेझर किरणांचा वापर गेली १० वर्षे केला जात आहे. लेझरच्या साह्याने अनेक उपचार केले जातात.

१) शरीरावरील, चेहऱ्यावरील आवश्यक केस काढणे.

२) फोटो रिजुव्हीनेशन- त्वचा पुनर्जीवन (हे आपण आधीच्या लेखात बघितले आहे.)

३) चेहऱ्यावरील काळे डाग नाहीसे करणे.

४) चेहऱ्यावरील तारुण्यपीटिका नाहीशा करणे.

५) पायांवरील 'व्हेरिकोज व्हेन्स' नाहीशा करणे.

६) चेहऱ्यावरील किंवा शरीराच्या इतर भागावरील व्रण कमी करणे.

या लेखामध्ये आपण मुख्यतः शरीरावरील अनावश्यक केसांबाबत लेझरचा उपयोग बघू या!

स्त्रियांना चेहऱ्यावर- विशेषतः ओठावर, हनुवटीवर, मानेवर अनावश्यक केस वाढू शकतात. याला 'हार्मोनल इम्बॅलन्स' कारणीभूत असतो. काही स्त्रियांमध्ये याची वाढ एवढी होते, की त्यांना न्यूनगंड निर्माण होतो. असे अनावश्यक केस काढण्यासाठी, तसेच हातांवरील, पायांवरील केस काढण्यासाठी स्त्रिया वॅक्सिंग, थ्रेडिंग, ब्लिचिंग करतात किंवा विविध प्रकारची क्रीम्स वापरतात. त्यामुळे त्वचा काळी पडू शकते. हायपरपिगमेंटेशन किंवा ॲलर्जिक रिॲक्शन येऊ शकते. हे कोणतेही उपाय कायमस्वरूपी नसतात. लेझर ट्रीटमेंटच्या साह्याने हे केस कायमचे काढून टाकता येतात.

केस वाढण्याचे तीन टप्पे असतात. काही केस वाढत असतात (ॲनाजेन फेज), तर काही गळत असतात (टिलोजेन फेज). याच्या मधील फेज म्हणजे कॅटाजेन फेज. हे चक्र आयुष्यभर चालू असते. मेलॅनिन नावाचे रंगद्रव्य ॲनाजेन फेजमधील केसांमध्ये सर्वाधिक असते. त्यामुळे या फेजमधील केसांमधील लेझर किरण पूर्णतः जाळून टाकतात व त्यामुळे ते पुन्हा उद्‍भवत नाहीत.

जेवढा केस काळा व जाड आणि त्वचा गोरी तेवढा चांगला रिझल्ट मिळतो. सर्वच केस एका वेळेस ॲनाजेन फेजमध्ये नसतात, त्यामुळे लेझर उपचार ५ ते ६ वेळा करावे लागतात. अशा पद्धतीने केलेल्या उपचारांमुळे अनावश्यक केस कायमस्वरूपी काढून टाकता येतात.

अनेक प्रकारचे लेझर याकरता वापरले जातात. PC, Nd YAG, Jiode ही काही प्रचलित नावे. आपली आशियन स्कीन ही गव्हवर्णी असून, त्याकरता सर्वांत सेफ लेझर Nd YAG हा आहे. या लेझरमुळे त्वचेला कमीत कमी हानी होते व त्यामुळे ट्रीटमेंट करताना जेल किंवा बर्फ इत्यादी वापरावे लागत नाही. ही ट्रीटमेंट पूर्णतः वेदनारहित असून, ओपीडी बेसीसवर केली जाते. या ट्रीटमेंटनंतर ज्या त्वचेवर लेझरचा उपयोग केला असेल ती सूर्यकिरणापासून बचाव करण्याकरिता सनस्क्रीनचा वापर आवश्यक आहे.

त्वचेच्या रंगानुसार, केसांच्या रंगानुसार, जाडीनुसार रिझल्ट बदलत असतात. त्यामुळे काही व्यक्तींना २-३ सीटिंगमध्येच उत्तम रिझल्ट मिळतो, तर काहींना ही ट्रीटमेंट ७-८ वेळा करावी लागते. योग्य त्या लेझर पॅरामीटरचा उपयोग न केल्यास त्वचेला इजा होऊ शकते. उदा.- भाजणे, त्वचा काळी पडणे इत्यादी. त्यामुळे अनावश्यक केस कायमचे कमी करण्याकरिता लेझर ट्रीटमेंट ही अत्यंत प्रभावी उपचार पद्धती असली तरी तज्ज्ञ व प्रशिक्षित डॉक्टरांकडूनच ती करून घेतलेली बरी!

सर्व लेझर ट्रीटमेंट या ऑफिस प्रोसिजर म्हणून केल्या जातात. ही ट्रीटमेंट करून तुम्ही लगेचसुद्धा कामावर जाऊ शकता. ट्रीटमेंटनंतर वेगळी अशी काही काळजी घेण्याची गरज नसते.

